## प्रकरण सहावे

# संशोधन अहवालाचा सारांश, निष्कर्ष व शिफारसी

यशस्वी अध्यापनासाठी पूर्वी विषयज्ञान असावे ही अपेक्षा होती. परंतू अध्यापनास आवश्यक कौशल्याचा विचार केला जात नव्हता. आज शिक्षणशास्त्राचा विकास व विविध अध्यापन पद्धती, अध्ययन पद्धती, अध्यापन साहित्याची निर्मिती झाली. आजचा विद्यार्थीही बहूश्रूत असल्याने शिक्षकह अध्यापन कौशल्यात परिपूर्ण असण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाची गुणवत्ता शिक्षण प्रक्रियेतील शिक्षकांच्या गुणवत्तेवर शिक्षकांची गुणवत्ता शिक्षक. प्रशिक्षणावर अवलंबून असते.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षक-प्रशिक्षणाला परिपक्वता आली. शिक्षकांचे शिक्षण कार्यक्रमात सुधारणा करण्यासाठी व गुणवत्ता वाढीसाठी एन्.सी.ई.आर.टी. संस्थेने शिक्षक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची रुपरेषा तीन क्षेत्रात सांगितली

१) शिक्षणाचे तत्वज्ञान २०%

२) समाजलक्ष्यी कार्य २०%

२) आशययुक्त पद्धती, मीमांसा, सराव अध्यापन संबंधित प्रात्यक्षिक कार्य ६०% विद्यार्थी-शिक्षकांना प्रशिक्षण देताना केवळ अध्यापन कौशल्याकडे लक्ष दिले जात नाही तर शिक्षकाचे संकल्पित व्यक्तिमत्व घडविले जाते.

सकस जीवनमूल्ये, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता, नि:पक्षपातीपणा, ध्येयवाद, विद्यार्थी प्रेम, शिक्षकी पेशाची आवड निर्माण करण्यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालये वाटचाल करीत आहेत.

शिक्षक प्रशिक्षणाची दोन अंगे आहेत १) तात्विक अंग २) कृतियुक्त अंग. या दोन्ही अंगात समतोल राखला तर शिक्षकांचे शिक्षण परिणामकारक होते. तात्विक

अंगामूळे शिक्षणाची सैद्धांतिक बैठक कळते व कृतियुक्त अंगामूळे अमूर्त सिद्धांतांना मूत स्वरुप देता येते. शिक्षकाच्या ज्ञान अध्यापन कौशल्यामुळे अध्यापन प्रक्रिया सुलभ होते. म्हणूनच विद्यार्थी शिक्षकाला सखोल विषयज्ञाना बरोबरच प्रभावी अध्यापन व्हावे म्हणून शैक्षणिक तत्वज्ञान, शैक्षणिक मानसशास्त्र, शैक्षणिक प्रशासन व व्यवस्थापन इ. औपचारिक अभ्यास व प्रात्यक्षिक कार्य, वर्गाध्यापनाचा सराव अशा नियंत्रत चौकटीत अभ्यासक्रम आखलेला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.एड्. अभ्यासक्रमात तात्विक विषय व प्रात्यक्षिक कार्याचा समावेश आहे. तात्विक विषयासाठी पाचशे गूण आहेत. त्याचे मूल्यमापन लेखी परीखेच्या सहाय्याने केले जाते. प्रात्यक्षिक कार्यासाठी पाचशे गूण आहेत. प्रात्यक्षिक कार्यात सराव पाठ, सूक्ष्म अध्यापन, आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र, तात्विक विषयांवर आधारित प्रात्यक्षिक व प्रपाठ लेखन अंतर्गत परीक्षा, समाजसेवा, कार्यानुभव शारीरिक शिक्षणा सांस्कृतिक कार्यक्रम, वार्षिक पाठ परीक्षा इ. चा समावेश आहे.

## संशोधन अभ्यासाची गरज :

संशोधक मागील सहा वर्षापासून विनाअनुदानित व अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अधयापन करीत आहे. बी.एड्. भाग दोनच्या प्रात्यक्षिकाची कार्यवाही करताना अडचणी येतात. विद्यापीठाच्या नियमानुसार व अभ्यासक्रमात नमूद प्रात्यक्षिकांची प्रत्यक्ष कार्यवाही करताना लागणारा वेळ व करावे लागणारे काम यांच्या तफावत दिसून येते. प्रात्यक्षिकांसाठी संदर्भ साहित्याची उपलब्धता, साहित्याची तरतूद, राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची संख्या, त्यासाठी, येणारा खर्च, लागणारा वेळ यामुळे समस्या निर्माण होतात. बी.एड्. महाविद्यालयांमध्ये प्रात्यक्षिक कार्याची अंमलबजावणी करताना उपक्रम निवडीत विविधता त्यामुळे मूल्यमापनावर होणारा परिणाम जाणवला. बी.एड्. महाविद्यालयातील प्राचार्य, विभाग प्रमुख यांच्याशी चर्चा करताना आढळून आले की, बी.एड्. अभ्यासक्रम पूस्तिकेत नमूद केलेल्या प्रात्यक्षिकांची कार्यवाही करत

असताना कामाचे नियोजन, कामासाठी लागणारा वेळ, साहित्य उपलब्धता, सरावशाळांचे सहकार्य, उपक्रमांची निवउ इ. अडचणी येतात. म्हणून संशोधकाने बी.एड्. महाविद्यालयात बी.एड्. भाग दोनच्या प्रात्यक्षिक कार्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या समस्यांची माहिती करुन घेण्यासाठी सदरहू समस्येची निवड केली आहे.

संशोधक बी.एड्. महाविद्यालयात शास्त्र अध्यापन पद्धतीचे अध्यापन करीत आहेत. विद्यार्थी शिक्षकांचे सूक्ष्म अध्यापन पाठ, सराव पाठ घेताना घटक निवड पाठ नियोजन, मार्गदर्शन प्रत्यक्ष अध्यापन, प्रत्याभरण सराव पाठ याबाबत अडचणी येतात. तात्विक विषयाचे प्रात्यक्षिकयादी प्रात्यक्षिक निवडीनुसार मार्गदर्शन, अहवालाचे मूल्यमापन करावे लागते. प्रपाठ लेखनासाठी प्रपाठ प्रश्न देणे, तपासणे, मार्गदर्शन देणे, नोंद करणे, याबाबी कराव्या लागात. समाजसेवा, कार्यानुभव सांस्कृतिक कार्यक्रम, शारीरिक शिक्षण, प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत परीक्षा यांची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी येतात. शिवाजी विद्यापीठांतर्गत इतर शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये बी.एड्. भाग दोनच्या प्रात्यक्षिक कार्याची अंमलबजावणी करताना कोणत्या समस्या येतात हे जाणून घेण्यासाठी व त्याबाबत उपाययोजना सूचविण्यासाठी काय करता येईल यासाठी या समस्येची निवड केली आहे.

## संशोधनाचे महत्व

बी.एड्. अभ्यासक्रम शिक्षक व्यवसायात परिवर्तन करणाऱ्यांसाठी व अध्यापनात सक्षम बनविण्याच्या दृष्टीकोनातून तयार केलेला आहे. विद्यार्थी शिक्षकांना अध्ययन अध्यापन प्रक्रियेविषयी मर्मदृष्टी प्राप्त व्हावी यासाठी बी.एड्. भाग दोन प्रात्यक्षिकावर आधारित आहे. म्हणून बी.एड्. महाविद्यालयातील प्रात्यक्षिक कार्याचे नियोजन करणाऱ्या विभागप्रमुखाना या संशोधनाचे मार्गदर्शन होईल. बी.एड्. प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीसाठी कामाच्या विभागणीबाबत महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापकांना मर्गदर्शन होईल. बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या

अडचणींचा विचार करुन पुनर्रचित अभ्यासक्रम तयारकरण्यासाठी व प्रात्यक्षिकाच्या कार्यवाहीत आवश्यक बदल करण्यासाठी व विद्यापीठ, एन्.सी.टी.ई. एन्. सी.ई. आर. टी. या संस्थांना मार्गदर्शन होणार आहे. अनुदानित व विनाअुनदानित महाविद्यालयांमध्ये प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करण्यासाठी लागणाऱ्या सुविधांची पूर्तता करण्यासाठी प्राचार्यव व व्यवस्थापक मंडळांना मार्गदर्शन होणार आहे.

## संशोधन समस्येचे शीर्षक :

"शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित बी.एड्. महाविद्यालयतील प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास"

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

या संशोधन समस्येची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे निश्चित केली होती.

१) सराव पाठ सूक्ष्म अध्यापन यांच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

२) तात्त्विक विषयांच्या प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

३) आशययुक्त अध्यापन पद्धती व अंतर्गत परीक्षा या संबंधी येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

४) समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रपाठ व शारीरिक शिक्षण यातील प्रात्यक्षिकांच्या संदर्भात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

५) वार्षिक पाठ परीक्षेच्या संदर्भात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

६) या समस्यांवर उपायोजना सूचविणे.

## संशोधन व्याप्ती व मर्यादा :-

संशोधकाने निवडलेली समस्या शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित बी.एड्. महाविद्यालयांना प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांपुरतीच मर्यादित आहे. बी.एड्. भाग २ च्या प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीतील समस्यांशिवाय बी.एड्. अभ्यासक्रमातील तात्विक विषयांचा विचार केला जाणार नाही. फक्त शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीचाच विचार केलेला आहे. इतर विद्यापीठाच्या प्रात्यक्षिक कामाचा विचार केला जाणार नाही. शिवाजी विद्यापीठामार्फत सूट्टीतील बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीत येणाऱ्या समस्यांचा विचार केलेला नाही.

सदर संशोधनात बी.एड्. भाग दोन च्या प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करताना प्राचार्य, संबंधित प्रात्यक्षिक कार्याचे विभागप्रमुख व प्राध्यापकांना येणाऱ्या समस्यांचा विचार केला आहे.

## संबंधित संशोधनाचे समीक्षण :-

या संशोधनात पुढील प्रमाणे दोन संबंधित पूर्व संशोधनाचा अभ्यास करुन समीक्षण केले आहे.

"A study of problem bearing on teacher Education in context of 10+2 pattern."

10+2 आकृतिबंधातील शिक्षक शिक्षणात येणाऱ्या समस्याचा अभ्यास करणे.

" A study o practical programme other than practice teaching in Teacher-Education Institutions."

शिक्षक प्रशिक्षण संस्थामधील सराव पाठाव्यतिरिक्त प्रात्यक्षिक कार्यक्रमाचा अभ्यास

करणे.

## संशोधन पद्धती व साधने :-

### संशोधन पद्धती :-

संशोधनाचे स्वरूप, उद्दिष्ट्ये व दृष्टीकोन लक्षात घेऊन सदरहू संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

### नमुना निवड :-

संशोधकाने या संशोधनात शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची संख्याव तेथील प्राचार्य व प्राध्यापकांचा संख्या विचारात घेवून सर्व अनुदानित व विनाअनुदानित शिक्षणशात्र महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नमुना गट निवडण्यात आलेला नाही.

### संशोधन साधने व तंत्रे :-

संशोधन अभ्यासाचे स्वरुप व उद्दिष्ट्ये विचारात घेवून संशोधकाने प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या संशोधन साधनांची निवड केली.

### प्रश्नावली :-

या संशोधन अभ्यासात शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित व विनाअुनदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य व सर्व प्राध्यापकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामूळे शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य, संबंधित प्रात्यक्षिकाचे विभागप्रमुख व प्राध्यापकांकडून प्रश्नावली द्वारे माहिती गोळा करण्यात आली आहे.

प्रश्नावली या साधनाद्वारे संशोधन उद्दिष्टांना अनुसरुन खालील प्रमाणे माहिती गोळा करण्यात आली आहे.

१) सराव पाठ व सूक्ष्म पाठाच्या कार्यवाहीतील अडचणी

२) तात्विक विषयांच्या प्रात्यक्षिक कार्याच्या कार्यवाहीतील अडचणी

३) आशययुक्त अध्यापन पद्धती व अंतर्गत परीक्षा या संबंधी येणाऱ्या समस्या

४) समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रपाठ व शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिकाबाबत येणाऱ्या समस्या

५) वार्षिक पाठ परीक्षेबाबत समस्या

मुलाखत व निरीक्षण :-

संशोधकाने बहुस्तरीय याद्दाच्छिक नमुना निवड पद्धतीने मुलाखतीसाठी चार अनुदानित व सहा विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्यांची निवड केली. तसेच त्याच महाविद्यालयातील प्रात्यक्षिक कार्याचे विभागप्रमुख यांची मुलाखतीसाठी निवड केली.

मुलाखतीसाठी ज्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य व प्रात्यक्षिक कार्यांचे विभागप्रमुखांची निवड केली आहे, त्योच शिक्षणशास्त्र महाविद्यायातील प्रात्यक्षिक कार्याची निरीक्षणासाठी निवड केली आहे.

निरीक्षणात खालील बाबींचे निरीक्षण करण्यात आले.

१) सराव पाठाचे वेळापत्रक, सराव पाठ निरीक्षणाबात नियोजन

२) सूक्ष्म अध्यापन पाठाचे नियोजन कार्यवाही

३)	तात्विक विषयांचे प्रात्यक्षिक कार्य

४)	मानसशास्त्रीय प्रयोगशाळा

५)	आशययुक्त अध्यापन पद्धती कामाचे नियोजन व वेळापत्रक

६)	समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रपाठ, शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिकांचे नियोजन.

## संख्याशास्त्राचा उपयोग

संशोधन साधनाद्वारा जमा केलेल्या माहितीचा उपयोग करण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय मापनाचा वापर केला आहे.

संशोधनाच्या प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षण या साधनाद्वारे माहिती संकलित करून त्या माहितीचे विश्लेषण केले आहे. संकलित सांख्यिकी माहिती व तिचे विश्लेषण यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

## ६.२ संशोधनाचे निष्कर्ष

या संशोधनासाठी प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या साधनद्वारा प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करून संशोधनाच्या उद्दिष्टयनुसार पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आलेले आहे.

## अ) सराव पाठ व सूक्ष्म अध्यापन

१) महाविद्यालयातील सराव पाठाचे नियोजन विभाग प्रमुख करतात. असा प्रतिसादकांचे प्रमाण ७८.४ आहे. प्राध्यापक गटवार सराव पाठाचे नियोजन करतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण २१.६ आहे.

२) महाविद्यालयातील सराव पाठाचे वेळापत्रक सराव पाठ होण्यापूर्वी चार दिवस आधी लावले जाते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७.२ आहे. सरावपाठाचे वेळापत्रक एक आठवडा अगोदर लावले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७३.६ आहे. सराव पाठाचे वेळापत्रक दोन आठवडा अगोदर लावले जाते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे.

३) महाविद्यालयात सराव पाठ तात्विक विषयाच्या तासिके पूर्वी घेतले जातात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १७.६ आहे. सराव पाठ तात्विक विषयाच्या तासिकेनंतर लावले जातात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६२.४ आहे. आठवड्यातील पूर्ण दोन दिवस सराव पाठ घेतले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २०.० आहे.

४) महाविद्यालयांना सराव पाठ घेण्यासाठी पुरेशा माध्यमिक शाळा उपलब्ध होतात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५४.४ आहे. सराव पाठासाठी माध्यमिक शाळा उपलब्ध होत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४५.६ आहे.

५) महाविद्यालयांना माध्यमिक शाळा उपलब्ध न झाल्याने प्राथमिक शाळेत पाठ लावण्याचे प्रमाण ४५.६३ आहे. उपलब्ध माध्यमिक शाळेत अधिक पाठ लावण्याचे प्रमाण १०.५२ आहे. पूर्ण दिवस पाठ सप्ताह घेण्याचे प्रमाण ४३.८५ आहे.

६) महाविद्यालयांना सराव पाठासाठी शाळांचे सहकार्य मिळते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

७) पाठ सराव शाळाच्या वेळापत्रकातील बदल महाविद्यालयांना कळवत नाही. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३९.५८ आहे. सराव पाठ शाळा शाळेच्ळा सुट्ट्या व वेळांमधील बदलाची पूर्वसूचना देत नाहीत. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३१.२६ आहे. विद्यार्थी-शिक्षकांना वेळेवर पाठ्यांश दिला जात नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २९.१६ आहे.

८) सराव पाठासाठी विद्यार्थी-शिक्षक पाठ्यांश स्वत: आणण्याचे प्रमाण ५७.६ आहे. शाळांमधून महाविद्यालयांमार्फत पाठ्यांश घेण्याचे प्रमाण १६.८ आहे. शाळा पाठ्यांश पाठवून देण्याचे प्रमाण २५.६ आहे.

९) सराव पाठाचे पाठ्यांश आणण्यात विद्यार्थी-शिक्षकांना अडचणी येण्याचे प्रमाण ६१.२ आहे. पाठ्यांश आणण्यासाठी अडचणी न येण्याचे प्रमाण ३८.८ आहे.

१०) महाविद्यालयातील प्राध्यापकांना पाठ मार्गदर्शनास पुरेसा वेळ मिळण्याचे प्रमाण ४८.०० आहे. पाठ मार्गदर्शनास पुरेसा वेळ न मिळण्याचे प्रमाण ५२.०० आहे.

११) महाविद्यालयातील प्राध्यापकांना सराव पाठाच्या मार्गदर्शनासाठी पुरेसा वेळ न मिळाल्याने महाविद्यालय सुरू होण्यापूर्वी मार्गदर्शन देण्याचे प्रमाण १.५४ आहे. महाविद्यालयीन वेळेनंतर पाठाचे मार्गदर्शन देण्याचे प्रमाण १५.४८ आहे. प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांच्या रिकाम्या तासिकेत मार्गदर्शन देण्याचे प्रमाण ८२.९८ आहे.

१२) सराव पाठ मार्गदर्शन सराव पाठापूर्वी कमीत-कमी एक दिवस अगोदर देण्याचे प्रमाण २०.८ आहे. पाठाचे मार्गदर्शन पाठापूर्वी तीन दिवस अगोदर देण्याचे प्रमाण ६२.४ आहे. एक आठवडा अगोदर पाठाचे मार्गदर्शन देण्याचे प्रमाण १६.८ आहे. सराव पाठ घेताना विद्यार्थी-शिक्षकांना प्रश्नावलीत विचारलेल्या सर्व अडचणी येतात, असे प्रमाण ३५.२ आहे. वर्गनियंत्रणाबाबत येण्याचे प्रमाण २८.८ आहे. शालेय विद्यार्थी सराव पाठाता प्रतिसाद देत नाहीत, ही अडचण येण्याचे प्रमाण १०.४ आहे. विद्यार्थी सराव पाठ चालू असताना अन्य कृती करताना ही अडचण येण्याचे प्रमाण ७.२ आहे. पाठास झालेला घटक शिकवल्यास पाठाकडे लक्ष न देण्याचे प्रमाण १२.०० आहे.

१४) महाविद्यालयातील प्राध्यापक एका दिवशी तीन सराव पाठाचे निरीक्षण करतात, असे प्रमाण २२.४ आहे. एका दिवशी चार पाठाचे निरीक्षण करतात, असे प्रमाण २२.४ आहे. एका दिवशी पाच पाठाचे निरीक्षण करतात, असे प्रमाण २५.६ आहे.

प्राध्यापक एका दिवशी सहा पाठांचे निरीक्षण करतात, असे प्रमाण २९.६ आहे.

१५) मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठ झाल्यावर त्वरित प्रत्याभरण देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५९.२ आहे. सर्व पाठांचे निरीक्षणानंतर शाळेतच प्रत्याभरण देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे. महाविद्यालयात अध्यापन पद्धतीच्या तासाला प्रत्याभरण देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २१.६ आहे.

१६) महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही दुसऱ्या दिवसापासून होते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४.८ आहे. चार दिवसानंतर सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही होते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ०.८ आहे. एका आठवड्याच्या उद्‌बोधनानंतर सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही होते. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७३.६ आहे. दोन आठवड्यानंतर सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही होते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २०.८ आहे.

१७) महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कालावधीत १२ दिवसांचा असल्याचे प्रमाण १२.०० आहे. सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण १५ दिवसांचे असण्याचे प्रमाण ४०.०० आहे. सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण १५ दिवसांपेक्षा जास्त असण्याचे प्रमाण ४८.०० आहे.

१८) सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षणासाठी सज्जता प्रवर्तन कौशल्य निवडणाऱ्यांचे प्रमाण ४२.८ आहे. स्पष्टीकरण कौशल्य निवडणाऱ्यांचे प्रमाण ९७.८ आहे. प्रश्न कौशल्य व प्रबलन कौशल्य निवडणाऱ्यांचे प्रमाण ८४.०० आहे. चेतक बदल कौशल्य निवडणाऱ्यांचे प्रमाण ७८.४ आहे. फलकाचा वापर कौशल्य निवडणाऱ्यांचे प्रमाण ७४.४ आहे. समारोप कौशल्य निवडणाऱ्यांचे प्रमाण २४.८ आहे.

१९) सूक्ष्म पाठ प्रशिक्षणासाठी विद्यार्थी-शिक्षकांचे गट हजेरी क्रमांकानुसार तयार केले जातात. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३९.२ आहे. विद्यार्थी-शिक्षकांचे गट प्रथम अध्यापन पद्धतीनुसार केले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६०.८ आहे.

२०) महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापन कौशल्याचा तात्विक भाग गटवार अध्यापनाद्वारे घेतला जातो. अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७.२ आहे. सूक्ष्म अध्यापन तात्विक वर्गात एकत्रित अध्यापनाद्वारे घेतला जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ९२.८ आहे.

२१) विद्यार्थी-शिक्षकांना सूक्ष्म पाठासाठी कौशल्यानुसार पाठ्यांश निवड करताना अडचणी येतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७६.०० आहे. विद्यार्थी-शिक्षकांना सूक्ष्म पाठासाठी कौशल्यानुसार पाठ्यांश निवडताना अडचणी येत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.०० आहे.

२२) सूक्ष्म पाठासाठी प्रश्नावलीत दिलेल्या दोन्ही अडचणी येण्याचे प्रमाण ५८.९० आहे. विद्यार्थी-शिक्षकांना सूक्ष्म अध्यापन कौशल्यानुसार पाठ्यांश निवडता येत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २३.१६ आहे. पाच मिनिटाच्या अध्यापनासाठी कमी किंवा अधिक पाठ्यांश निवडला जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १८.९४ आहे.

२३) सूक्ष्म पाठाच्या प्रत्याभरणासाठी प्राध्यापकांची पाठ निरीक्षणाबाबत केलेल्या नोंदीचा वापर केला जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४१.२ आहे. प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी केलेल्या पाठ निरीक्षण नोंदीचा वापर केला जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५६.२ आहे. पाठाचे टेपरेकॉर्डच्या सहाय्याने प्रत्याभरण देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २.६ आहे.

२४) सूक्ष्म पाठ निरीक्षण करताना विद्यार्थी-शिक्षकांना अडचणी येतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७०.४ आहे. सूक्ष्म पाठ निरीक्षणात विद्यार्थी-शिक्षकांना अडचणी येत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे.

२५) सूक्ष्म पाठ निरीक्षणास प्रश्नावलीत दिलेल्या सर्व अडचणी विद्यार्थी-शिक्षकांना येतात, अशा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ४८.८० आहे. विद्यार्थी-शिक्षकांना सूक्ष्म

पाठ कौशल्यांच्या उपकौशल्यांची बारकाईचे नोंद करता येत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाणा ३२.०० आहे. विद्यार्थी-शिक्षकांना परनिश्चयन श्रेणीचा वापर करता येत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५.६० आहे. पाठ घेणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकाच्या अध्यापनातील उणिवा/दोष नोंदवता येत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १३.६ आहे.

२६) सूक्ष्म पाठाच्या प्रत्याभरणासाठी पाच मिनिटांपर्यंत वेळ देणाऱ्यांचे प्रमाण ३९.२ आहे. प्रत्याभरणासाठी ५ ते १० मिनिटांपर्यंत वेळ देणाऱ्यांचे प्रमाण ६०.८ आहे.

२७) सूक्ष्म पाठ अभिरुप परिस्थितीत घेताना विद्यार्थी-शिक्षक भूमिकेचे पालन करत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे. विद्यार्थी-शिक्षक विद्यार्थ्यांच्या भूमिकेचे पालन करत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४८.०० आहे. सूक्ष्म पाठासाठी निवडलेल्या इयत्तेनुसार वर्गातील वातावरण निर्मिती होत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७५.२ आहे. विद्यार्थी-शिक्षक पाठासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य वापरत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १६.०० आहे.

२८) सूक्ष्म पाठ प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर विद्यार्थी-शिक्षकांचे सूक्ष्म पाठ पुन्हा घेतले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

२९) गैरहजर विद्यार्थी-शिक्षकांचे सूक्ष्म पाठ घेताना प्राध्यापकांना जादा वेळ काम करावे लागते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७२.८ आहे. प्राध्यापकांना वेळ मिळेल तेव्हा सूक्ष्म पाठ घेतले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४४.४ आहे. गटातील इतर विद्यार्थी-शिक्षकांचा वेळ वाया जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३८.४ आहे. गैरहजर विद्यार्थी-शिक्षकाच्या पाठास गटातील इतर विद्यार्थी-शिक्षक प्रतिसाद देत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३४.४ आहे.

## २) तात्विक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य

३०) महाविद्यालयात प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी-शिक्षकांना दिले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६३.२ आहे. प्रात्यक्षिक निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी-शिक्षकांना दिले जात नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३६.८ आहे.

३१) महाविद्यालयात तात्विक विषयाच्या प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी-शिक्षकांना दिल्यास स्वतंत्ररित्या मार्गदर्शन करावे लागते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३०.४ आहे. अहवाल लेखन तपासताना मूल्यमापन पद्धती बदलावी लागते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १८.४ आहे. दिलेल्या प्रात्यक्षकापैकी सोपे प्रात्यक्षिक कार्य विद्यार्थी-शिक्षक निवडतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३५.२ आह. सर्वेक्षण, व्यक्ती अभ्यास, प्रत्यक्ष भेटी इ.वर आधारित प्रात्यक्षिक कार्यापेक्षा केवळ लेखनावर आधारित प्रात्यक्षिक निवडीवर भर दिला जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.०० आहे.

३२) पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक कार्य शालेय अनुभव कार्यक्रमात पूर्ण करून घेणाऱ्यांचे प्रमाण ७०.४ आहे. पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक कार्य शालेय अनुभव कार्यक्रमात पूर्ण करून न घेणाऱ्यांचे प्रमाण २९.६ आहे.

३३) पेपर क्र. ४ च्या ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य वैयक्तिक घेणाऱ्यांचे प्रमाण ६५.६ आहे. पेपर क्र. ४ च्या ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य गटवार घेणाऱ्यांचे प्रमाण ३४.४ आहे.

३४) महाविद्यालयात मूल्यमापन कृतिसत्र घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

३५) महाविद्यालयात मूल्यमापन कृतिसत्रात येणाऱ्या अडचणींपैकी कृतिसत्राच्या कालावधीत तात्विक भाग समजावून दिल्यास प्रात्यक्षिक कार्यास वेळ अपुरा पडतो,

अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३४.४ आहे. मूल्यमापनावरील पुरेसे संदर्भ साहित्य उपलब्ध नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २३.२ आहे. घटक चाचणीची अंमलबजावणी न केल्याने प्रश्नवार पृथ:करणात प्रश्नांचा काठिण्यस्तर ठरवता येत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे.

३६) पेपर क्र. ५ पचे प्रात्यक्षिक कार्यांतर्गत मूल्यमापन कृतिसत्र घेणाऱ्यांचे प्रमाण १००.०० आहे. शैक्षणिक प्रकल्प घेणाऱ्यांचे प्रमाण ११.२ आहे. शैक्षणिक साहित्य निर्मितीचे प्रमाण ५०.४ आहे. क्षेत्रीय सहलीचे आयोजन करणाऱ्यांचे प्रमाण १३.६ आहे. अध्यापन पद्धतीशी संबंधित सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्यांचे प्रमाण १६.८ आहे व भित्तीपत्रक तयार करणाऱ्यांचे प्रमाण १७.६ आहे.

३७) महाविद्यालयात स्वतंत्र मानसशास्त्रीय प्रयोगशाळा आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७५.२ आहे. स्वतंत्र मानसशास्त्रीय प्रयोगशाळा नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.८ आहे.

३८) महाविद्यालयात मानसशास्त्राचे प्रयोग गटवार होण्यासाठी फर्निचर उपलब्ध आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८४.०० आहे. फर्निचर उपलब्ध नाही, असा प्रतिसादकांचे प्रमाण १६.०० आहे.

३९) महाविद्यालयातून मानसशास्त्रीय प्रयोग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना बेंच असणाऱ्यांचे प्रमाण ४५.६ आहे. मानसशास्त्रीय प्रयोगासाठी टेबल व स्टूल/खुर्ची असणाऱ्यांचे प्रमाण ५४.४ आहे.

४०) महाविद्यालयात वैयक्तिक प्रयोगाचे पुरेसे साहित्य उपलब्ध असणाऱ्यांचे प्रमाण ६८.६ आहे. वैयक्तिक प्रयोगाचे पुरेसे साहित्य उपलब्ध नाही, अशांचे प्रमाण ३१.२ आहे.

४१) महाविद्यालयात मानसशास्त्रीय प्रयोग वैयक्तिकरित्या करण्यास पुरेसे साहित्य

नसल्यास प्रयोग गटवार केले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.८ आहे. वैयक्तिकरित्या करण्यास पुरेसे साहित्य नसल्यास एकच प्रयोग गटवार प्रयोग करतो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७५.२ आहे.

४२) महाविद्यालयात मानसशास्त्र प्रयोगासाठी दिलेली तासिका पुरेशी आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६४.०० आहे. मानसशास्त्र प्रयोगासाठी दिलेली तासिका पुरेशी नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३६.०० आहे.

४३) महाविद्यालयात विद्यार्थी-शिक्षकांची मानसशास्त्र प्रयोगवही तपासण्यासाठी दिलेल्या वेळेत सादर करण्याचे प्रमाण ७०.४ आहे. विद्यार्थी-शिक्षक प्रयोगवही दिलेल्या वेळेत सादर न करण्याचे प्रमाण २९.६ आहे.

४४) विद्यार्थी-शिक्षक प्रयोगवहीत मानसशास्त्र प्रयोगाचे शैक्षणिक महत्व प्रयोगानंतर झालेल्या चर्चेवरून लिहितात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५९.२ आहे. प्रयोगाचे शैक्षणिक महत्व संदर्भ पुस्तकावरून लिहितात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २५.६ आहे. विद्यार्थी-शिक्षक प्रयोगाचे शैक्षणिक महत्व स्वत:च्या अनुभवावरून उदाहरण देवून लिहितात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १५.२ आहे.

## ३) आशययुक्त अध्यापन पद्धती व अंतर्गत परीक्षा

४५) महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र प्रथम सत्राच्या शेवटी घेणाऱ्यांचे प्रमाण ५६.८ आहे. आशययुक्त अध्यापन पद्धती द्वितीय सत्राच्या सुरुवातीस घेणाऱ्यांचे प्रमाण २३.२ आहे.

४६) महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्र सात दिवसांचे घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १३.६ आहे. कृतिसत्र आठ दिवसांचे घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४.८ आहे. आशययुक्त अध्यापन कृतिसत्र दहा दिवसांचे घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५९.२ आहे, तर बारा दिवसांचे कृतिसत्र घेतले

जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २६.४ आहे.

४७) महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी प्राध्यापकांशी चर्चा केली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

४८) महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन कृतिसत्रापूर्वी प्रश्नावलीत विचारलेल्या सर्व बाबींवर चर्चा होते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

४९) महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन पद्धतीवर आधारित चाचणी कृतिसत्राच्या शेवटच्या दिवशी घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ९२.८ आहे. आशय चाचणी आशययुक्त अध्यापन कृतिसत्रानंतर काही दिवसांनी घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७.२ आहे.

५०) महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४४.८ आहे. महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा घेतल्या जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५५.२ आहे.

५१) महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३२.८० आहे. अंतर्गत परीक्षा द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिना अगोदर घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४३.६० आहे. एकच अंतर्गत परीक्षा वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २३.६० आहे.

५२) महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी व वार्षिक पाठ परीक्षेनंतर लगेच घेतल्या जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३५.७० आहे. दोन अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी व वार्षिक पाठ परीक्षेअगोदर घेतल्या जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १८.६० आहे. दोन अंतर्गत परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी व द्वितीय सत्र समाप्तीपूर्वी एक महिनाअगोदर घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण

४५.७० आहे.

५३) महाविद्यालयात एकच अंतर्गत परीक्षा पन्नास गुणांची घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३४.६० आहे. साठ गुणांची अंतर्गत परीक्षा घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४०.०० आहे. शंभर गुणांची अंतर्गत परीक्षा घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २५.४० आहे.

५४) महाविद्यालयात दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी चाळीस गुणांची घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.३० आहे. दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी पन्नास गुणांची घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५०.५० आहे. दोन अंतर्गत परीक्षा प्रत्येकी ६० गुणांची घेतली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २५.२० आहे.

५५) महाविद्यालयात अंतर्गत परीक्षांचे मूल्यमापन झाल्यावर प्रत्याभरण केले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

## ४) समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रपाठ, शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिक

५६) महाविद्यालयात समाजसेवेच्या प्रात्यक्षिकापूर्वी तीन व्याख्याने दिली जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे. समाजसेवा प्रात्यक्षिकापूर्वी चार व्याख्याने दिली जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५.६ आहे. समाजसेवा प्रात्यक्षिकापूर्वी पाच व्याख्याने दिली जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६४.८ आहे.

५७) महाविद्यालयात समाजसेवेची पाच व्याख्याने महाविद्यालयातील प्राध्यापक देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५४.४ आहे. समाजसेवेचे व्याख्यान महाविद्यालयातील प्राध्यापक, तसेच परिसरातील समाजसेवक देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १७.६ आहे. समाजसेवेची व्याख्याने महाविद्यालयातील प्राध्यापक व शाळेत समाजसेवा विषय शिकविणारे शिक्षक देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १४.४ आहे.

समाजसेवेची व्याख्याने महाविद्यालयातील प्राध्यापक परिसरातील समाजसेवक व शाळेत समाजसेवा विषय शिकवणारे शिक्षक देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १३.६ आहे.

५८) महाविद्यालयात शैक्षणिक वर्षात समाजसेवेचे उपक्रम सातत्याने घेतले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७१.२ आहे. शैक्षणिक वर्षात उपक्रम सातत्याने घेतले जात नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २८.८ आहे.

५९) महाविद्यालयात समाजसेवा शिबिर एक दिवसाचे घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७२.०० आहे. समाजसेवा शिबिर दोन दिवसांचे घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ११.२ आहे. समाजसेवा शिबिर तीन दिवसांचे घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५.६ आहे. समाजसेवा शिबिर घेतले जात नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ११.२ आहे.

६०) समाजसेवा महाविद्यालयीन, शालेय व सामाजिक स्तरावर केली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५१.२ आहे. समाजसेवा महाविद्यालयीन व शालेय स्तरावर केली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे. समाजसेवा महाविद्यालयीन व सामाजिक स्तरावर केली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २६.४ आहे.

६१) समाजसेवांतर्गत शिबिरात वृक्षारोपण करणाऱ्यांचे प्रमाण ४९.६ आहे. शिबिरात परिसर स्वच्छता करणाऱ्यांचे प्रमाण ९२.८ आहे. प्रौढांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे उद्‌बोधन करणाऱ्यांचे प्रमाण ५९.२ आहे. शिबीर परिसरातील विद्यार्थ्यांना काही तास शिकविणाऱ्यांचे प्रमाण २८.०० आहे. हळदी-कुंकू कार्यक्रम करणाऱ्यांचे प्रमाण ५.६ आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विशेष दिनात सहभागी होणाऱ्यांचे प्रमाण ५०.४ आहे.

६२) महाविद्यालयात समाजसेवेच्या उपक्रमात विद्यार्थी-शिक्षक सहभागी होतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १००.०० आहे.

६३) समाजसेवांतर्गत उपक्रमातील विद्यार्थी-शिक्षक अहवाल लेखन व्यवस्थित करत नाहीत व अनुभवी समाजसेवक व तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा अभाव अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५५.२ आहे. विद्यार्थी-शिक्षक अहवाल लेखन व्यवस्थित करत नाहीत, समाजसेवा उपक्रमात स्वेच्छेने सहभागी होत नाहीत, अनुभवी समाजसेवक व तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा अभाव अशा प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे.

६४) महाविद्यालयात कार्यानुभव प्रात्यक्षिक दोन दिवस घेणाऱ्यांचे प्रमाण ४९.६ आहे. कार्यानुभव प्रात्यक्षिक तीन दिवस घेणाऱ्यांचे प्रमाण ३१.२ आहे. कार्यानुभव प्रात्यक्षिक चार दिवस घेणाऱ्यांचे प्रमाण १९.२ आहे.

६५) महाविद्यालयात कार्यानुभवाची दोन तात्विक व्याख्याने देणाऱ्यांचे प्रमाण ८.०० आहे. तीन तात्विक व्याख्याने देणाऱ्यांचे प्रमाण ५.६ आहे. चार तात्विक व्याख्याने देणाऱ्यांचे प्रमाण ६.४ आहे. कार्यानुभवाची पाच तात्विक व्याख्याने देणाऱ्यांचे प्रमाण ८०.०० आहे.

६६) महाविद्यालयात कार्यानुभवासाठी ब्रेड-बिस्कीट तयार करणाऱ्यांचे प्रमाण ११.२ आहे. कुंडीतील लागवड करणाऱ्यांचे प्रमाण ३१.२ आहे. मिठाई तयार करणाऱ्यांचे प्रमाण १२.०० आहे. फाईल, लिफाफे तयार करण्याचे प्रमाण ७८.४ आहे. पुस्तक बांधणीचे प्रमाण २०.६ आहे. गुंडाळफलक तयार करण्याचे प्रमाण ४०.८ आहे. विद्युत उपकरण तयार करण्याचे प्रमाण १४.४ आहे. खडू तयार करण्याचे प्रमाण ३०.४ आहे. ग्रिटिंग्ज कार्डस् तयार करण्याचे प्रमाण ७३.६ आहे. मेणबत्त्या तयार करण्याचे प्रमाण ०.५५ आहे. भरतकाम/विणकाम करणाऱ्यांचे प्रमाण १२.०० आहे. शैक्षणिक साहित्य निर्मितीचे प्रमाण ७.२ आहे.

६७) महाविद्यालयात कार्यानुभव विषयाचे प्रात्यक्षिक वैयक्तिक घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३८.४ आहे. कार्यानुभव प्रात्यक्षिक गटवार घेतले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५५.२ आहे. काही प्रात्यक्षिक वैयक्तिक गटवार घेतले जातात,

अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८६.४ आहे.

६८) कार्यानुभव प्रात्यक्षिकातील अडचणींपैकी कार्यानुभव विषयाच्या व्याख्यानासाठी संदर्भ साहित्य उपलब्ध नसते. प्रात्यक्षिक कार्याच्या मार्गदर्शनासाठी प्रशिक्षित प्राध्यापक उपलब्ध नसतात व प्रात्यक्षिकसाठी लागणारे साहित्य उपलब्ध नसते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५१.२ आहे. कार्यानुभव विषय व्याख्यानासाठी संदर्भ साहित्य व प्रात्यक्षिक कार्याच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित प्राध्यापक उपलब्ध नसतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २८.०० आहे. कार्यानुभव प्रात्यक्षिकाच्या मार्गदर्शनासाठी प्रशिक्षित प्राध्यापक व प्रात्यक्षिकासाठी लागणारे साहित्य उपलब्ध नसते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २०.८ आहे.

६९) महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम आठवड्यातून घेतला जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४०.०० आहे. दोन आठवड्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतला जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे. महिन्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतला जातो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५२.०० आहे.

७०) प्राचार्य व सांस्कृतिक विभागप्रमुखांच्या मुलाखतीवरून सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद मिळतो व विद्यार्थी-शिक्षक स्वेच्छेने सहभागी होतात.

७१) महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम कुलपद्धतीने घेणाऱ्यांचे प्रमाण ८८.८ आहे. सांस्कृतिक कार्यक्रम कुलपद्धतीने न घेणाऱ्यांचे प्रमाण ११.२ आहे.

७२) महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रत्येक कुलात १० विद्यार्थी-शिक्षक असतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २५.५ आहे. प्रत्येक कुलात २० विद्यार्थी-शिक्षक असतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७२.०० आहे. प्रत्येक कुलात ३० विद्यार्थी-शिक्षक असतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २.४ आहे.

७३) महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत सुविचार लेखन करणाऱ्यांचे प्रमाण

७६.०० आहे. बातमीपत्र तयार करण्याचे प्रमाण ५१.२ आहे. भित्तीपत्रक लेखनाचे प्रमाण ७१.२ आहे. विविध उत्सव, सण साजरे करण्याचे प्रमाण ९१.२ आहे. जयंती-पुण्यतिथी साजरी करण्याचे प्रमाण ९६.०० आहे. परिसंवाद चर्चा आयोजनाचे प्रमाण ६८.०० आहे. व्याख्याने आयोजित करण्याचे प्रमाण १००.०० आहे. विविध स्पर्धा घेण्याचे प्रमाण ६७. आहे. एकांकिका बसविण्याचे प्रमाण ६०.८ आहे. सांघिक खेळ घेण्याचे ६१.६ आहे. विविध गुणदर्शन नियोजनाचे प्रमाण १५.२ आहे.

७४) महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन घेण्याचे प्रमाण ६८.८ आहे. वार्षिक स्नेहसंमेलन न घेण्याचे प्रमाण ३१.२ आहे.

७५) महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम कार्यवाहीत येणाऱ्या अडचणींपैकी पाठ, लेखनकार्य व सातत्याने असलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थी-शिक्षक सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्यास उत्सुक नसतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८०.०० आहे. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या साचेबंद उपक्रमांमुळे सर्वच विद्यार्थी-शिक्षकांच्या कलागुणांना वाव मिळत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४६.४ आहे. सांस्कृतिक कार्यक्रमास आवश्यक वाद्ये व इतर साहित्य उपलब्ध नसल्यामुळे वातावरण निर्मिती होत नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४९.६ आहे.

७६) महाविद्यालयात प्रपाठाचे प्रश्न विद्यार्थी-शिक्षकांना एक आठवडा अगोदर दिले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४८.०० आहे. प्रपाठाचे प्रश्न दोन आठवडे अगोदर दिले जातात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५२.०० आहे.

७७) विद्यार्थी-शिक्षक प्रपाठ लेखनापूर्वी प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे तपासून घेतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ९२.०० आहे. विद्यार्थी-शिक्षक प्रपाठ लेखनापूर्वी प्रपाठाच्या प्रश्नांची उत्तरे तपासून घेत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे.

७८) महाविद्यालयात प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसण्यास परवानगी दिली जात नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २२.४ आहे. प्रपाठापूर्वी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसू दिले जात नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७७.६ आहे.

७९) प्रपाठाची प्रश्नोत्तरे तपासताना प्राध्यापकांना येणाऱ्या अडचणींपैकी प्रश्न तपासण्यास व मार्गदर्शनास स्वतंत्र वेळ द्यावा लागतो, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५७.६० आहे. सर्वच विद्यार्थी-शिक्षक प्रपाठाचे प्रश्न तपासून घेत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे. विद्यार्थी-शिक्षकांनी प्रपाठाचे प्रश्न तपासून घेतल्याची स्वतंत्र नोंद ठेवावी लागते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३४.४ आहे.

८०) प्रपाठ तपासल्यानंतर विद्यार्थी-शिक्षकांना वैयक्तिक प्रत्याभरण दिले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे. वर्गात समान त्रुटींचा उल्लेख करून विद्यार्थी-शिक्षकांना प्रत्याभरण दिले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६९.६ आहे. प्रश्नासाठी आवश्यक मुद्दे सांगून प्रत्याभरण दिले जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ११.२ आहे.

८१) महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाचे उपक्रम वर्षभर सातत्याने चालतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.८ आहे. महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाचे उपक्रम वर्षभर सातत्याने चालत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७५.२ आहे.

८२) महाविद्यालयास स्वतंत्र क्रीडांगण असण्याचे प्रमाण ८४.८ आहे. महाविद्यालयास स्वतंत्र क्रीडांगण नसण्याचे प्रमाण १५.२ आहे.

८३) महाविद्यालयात अभ्यासक्रमात नमूद सर्व खेळांचे साहित्य उपलब्ध आहे, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ५३.६ आहे. अभ्यासक्रमात नमूद सर्व खेळांचे साहित्य उपलब्ध नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४६.४ आहे.

८४) महाविद्यलयात क्रिकेटचे साहित्य आहे. असे प्रमाण ६०.८ आहे. व्हॉलिबॉलचे साहित्य उपलब्ध आहे, असे प्रमाण ८४.८ आहे. टेनिसचे साहित्य आहे, असे प्रमाण ३७.६ आहे. बॅडमिंटनचे साहित्य आहे, असे प्रमाण ६२.४ आहे. शॉर्टपूटसाठी गोळा आहे, असे प्रमाण ४०.०० आहे. उड्याच्या दोऱ्या असण्याचे प्रमाण ९८.४ आहे. फुटबॉल उपलब्ध असण्याचे प्रमाण ६४.०० आहे.

८५) महाविद्यालयात शारीरिक शिक्षणाची तात्त्विक माहिती महाविद्यालयातील प्राध्यापक देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७८.४ आहे. शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक तात्त्विक माहिती देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १३.६ आहे. बी.पी.एड्. झालेले विद्यार्थी-शिक्षक शारीरिक शिक्षणाची तात्त्विक माहिती देतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८.०० आहे.

८६) शारीरिक शिक्षणाच्या प्रात्यक्षिक कार्यवाहीत येणाऱ्या अडचणींपैकी खेळात भाग घेण्यास विद्यार्थी-शिक्षक नसतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २१.४८ आहे. महाविद्यालयात खेळांचे पुरेसे साहित्य उपलब्ध नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १६.३० आहे. खेळाचा सराव नसल्याने विद्यार्थी-शिक्षक केवळ परीक्षेसाठी भाग घेतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २४.८० आहे. खेळांचे प्रात्यक्षिक राबविण्यात तज्ञ व्यक्ती उपलब्व होत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २०.८० आहे. खेळाच्या माहितीविषयक संदर्भ साहित्य उपलब्ध नाही, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १७.६२ आहे.

## ५) वार्षिक पाठ परीक्षा

८७) महाविद्यालयाच्या वार्षिक पाठ परीक्षेसाठी पुरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ७०.४ आहे. महाविद्यालयाच्या वार्षिक पाठ परीक्षेसाठी पुरेसे बहिस्थ परीक्षक उपलब्ध होत नाहीत, अशा प्रतिसादकांचे प्रमाण २९.६ आहे.

८८) वार्षिक पाठ परीक्षेसाठी पुरेसे परीक्षक उपलब्ध नसल्यास उपलब्ध परीक्षकांची नेमणूक केली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ३७.५ आहे. कमी शैक्षणिक अनुभव असणाऱ्या परीक्षकाची नेमणूक केली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १५.०० आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक अंतर्गत परीक्षक म्हणून उपलब्ध नसतील, तर बहिस्थ परीक्षकाची नेमणूक केली जाते, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ४७.५ आहे.

८९) वार्षिक पाठ परीक्षेबाबत बहिस्थ परीक्षकांविषयी येणाऱ्या अडचणींपैकी विद्यापीठाने नेमलेले बहिस्थ परीक्षक सलग रजेमुळे काम नाकारतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे. परीक्षेसाठी मानधन कमी व उशिरा मिळत असल्याने बहिस्थ परीक्षक काम करण्यास उत्सुक नसतात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण ६१.६ आहे. बहिस्थ परीक्षक ऐनवेळी नकार कळवितात, अशा प्रतिसादकांचे प्रमाण १९.२ आहे.

## ६.३ शिफारसी

### १) सराव पाठ व सूक्ष्म अध्यापन :

१) सराव पाठासाठी प्राध्यापकांच्या गटवार नियोजनामुळे मार्गदर्शन प्रत्यक्ष पाठाची कार्यवाही व दररोज पाठाची संख्या यामध्ये असमानता निर्माण होते. म्हणून सराव पाठाचे गटवार नियोजन करण्यात येऊ नये. सराव पाठाचे नियोजन सराव पाठ विभागप्रमुखानेच करावे.

२) सराव पाठाचे पाठटाचण, पाठमार्गदर्शन, शैक्षणिक साहित्याची निर्मिती यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून पाठाचे वेळापत्रक नियोजित पाठापूर्वी कमीत-कमी एक आठवडा अगोदर लावावे.

३) सराव पाठ तात्विक विषयांच्या तासिकांपूर्वी लावण्यास, त्यास परिणाम तात्विक विषयांच्या अध्ययनावर अनिष्ट होतो. म्हणून तात्विक विषयांच्या तासिकेपूर्वी पाठ न लावता, विषयांच्या तासिकानंतर लावण्यात यावेत.

३) सराव पाठ घेण्यासाठी महाविद्यालयाच्या परिसरात पुरेशा प्रमाणात माध्यमिक शाळा उपलब्ध नसल्याने पाठाचे नियोजन, विविध माध्यमिक शाळांचे प्रशासन व व्यवस्थापन, विविध शाळांचे सहशालेय उपक्रम, याबाबत अनुभवांची पुरेशी संधी मिळत नाही म्हणून प्रशिक्षण महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी देण्यापूर्वी परिसरातील उपलब्ध माध्यमिक शाळांची संख्या विचारात घ्यावी.

५) सराव पाठ घेण्यापूर्वी विद्यार्थी-शिक्षकांनी स्वत: शाळेत जाऊन पाठ्यांश आणल्यास वर्गरचना, शालेय शिस्त, विषय शिक्षकांशी चर्चा व शैक्षणिंक साहित्याची उपलब्धता इ. बाबतीत माहिती होते. म्हणून ज्या शाळा विद्यार्थी-शिक्षकांना पाठ्यांश घेण्यास परवानगी देत नाहीत, अशा शाळांशी प्राचार्यांनी सुसंवाद साधून परवानगी मिळवावी.

६) सराव पाठाचे पाठ्यांश आणण्याबाबत विद्यार्थी-शिक्षकांना अनेक अडचणी येतात. त्यामुळे पाठ मार्गदर्शन व पाठ नियोजन वेळेत पूर्ण होत नाही. म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य व शाळाप्रमुख यांनी सुसंवाद साधून सदरहू अडचणी दूर करून विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठाचे पाठ्यांश वेळेत मिळण्याची व्यवस्था करावी.

७) सराव पाठाची पूर्वतयारी, पाठटाचण, दुरुस्ती व शैक्षणिक साहित्य निर्मिती यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून नियोजित पाठापूर्वी कमीत-कमी तीन दिवस अगोदर पाठाचे मार्गदर्शन आवश्यक असते. म्हणून पाठ मार्गदर्शन तीन दिवस अगोदर देण्यात यावे. एक दिवस अगोदर पाठाचे मार्गदर्शन देण्यात येऊ नये.

८) प्राध्यापकांनी दररोज तीन ते चार पाठांचे निरीक्षण केल्यास मार्गदर्शन व पाठनिरीक्षणात सुलभता येते. म्हणून प्राध्यापकांना एका दिवशी तीन ते चार पाठ निरीक्षण देण्यात यावे. चारपेक्षा अधिक पाठ निरीक्षण एका दिवशी देण्यात येऊ नये.

९) सराव पाठाचे प्रत्याभरण त्याच दिवशी पाठ पाहून झाल्यावर त्याच शाळेत किंवा

महाविद्यालयात अध्यापन पद्धतीच्या तासाला देण्यात यावे. प्रत्येक पाठ झाल्यावर प्रत्याभरण दिल्यास पुढील तासांच्या विद्यार्थी-शिक्षकांच्या पाठातील सुरुवातीच्या वेळेतील उणिवांचे निरीक्षण करावयास मिळणार नाही म्हणून पाठ झाल्यावर तेथेच प्रत्याभरण देण्यात येवू नये.

१०) महाविद्यालयात शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस एका आठवड्याच्या उद्‌बोधनानंतर सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही करावी. एका आठवड्याच्या आत सूक्ष्म अध्यापनाची कार्यवाही करण्यात येवू नये.

११) विद्यापीठाच्या नियमानुसार सूक्ष्म अध्यापनाचा कालावधी १५ दिवसाचा आहे. म्हणून सूक्ष्म अध्यापन १२ दिवसांपेक्षा कमी व १५ दिवसांपेक्षा अधिक दिवस न घेता सदरहू कृतिसत्र १५ दिवसांचे घेण्यात यावे.

१२) विविध महाविद्यालयातील विविध सूक्ष्म अध्यापन कौशल्ये घेतली जातात. त्यामुळे सर्व महाविद्यालयांमध्ये सूक्ष्म अध्यापन कौशल्यांच्या बाबतीत समानता येण्यासाठी विद्यापीठ पातळीवर सूक्ष्म अध्यापन कौशल्य निश्चित करून ती घेण्याची सर्व महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

१३) सूक्ष्म अध्यापन कृतिसत्रासाठी विद्यार्थी-शिक्षकांची हजेरी क्रमांकानुसार विभागणी केल्यामुळे अध्यापन पद्धतीत समानता न राहता विविधता असते. त्यामुळे पाठ मार्गदर्शन, पाठ निरीक्षण, पाठ्यांश निवड इ. बाबतीत अनेक अडचणी येतात. म्हणून हजेरी क्रमांकानुसार विद्यार्थी-शिक्षकांची विभागणी न करता गटातील सर्व विद्यार्थी-शिक्षकांची कमीत-कमी एक अध्यापन पद्धती समान असेल, त्यानुसार गटाची विभागणी करण्यात यावी.

१४) महाविद्यालयात सूक्ष्म अध्यापन कौशल्याचा तात्विक भाग वर्गात एकत्रित न घेता गटवार तात्विक भाग घेण्यात यावा.

१५) सूक्ष्म अध्यापन पाठ कृतिसत्रात ज्या ठिकाणी विद्यार्थी-शिक्षक विद्यार्थ्यांच्या भूमिकेचे पालन, शैक्षणिक साहित्याचा वापर, वातावरण निर्मिती करत नाहीत, अशा महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विद्यार्थी-शिक्षकांना या कृतिसत्राचे महत्व व आपली भूमिका या संदर्भात माहिती दिल्यास या कृतिसत्रात येणाऱ्या अडचणी दूर होतील.

१६) सूक्ष्म अध्यापन कृतिसत्रास गैरहजर विद्यार्थी-शिक्षकांचे पाठ पूर्ण करताना महाविद्यालयातील प्राध्यापकांनी, विद्यार्थी-शिक्षकांनी गैरहजर विद्यार्थी-शिक्षकांच्या अडचणी लक्षात घेवून त्यांचे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यास सहकार्य करावे.

## २) तात्विक विषयांचे प्रात्यक्षिक कार्य

१) प्रशिक्षण महाविद्यालयात विद्यार्थी-शिक्षकांना प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य दिल्यामुळे प्रात्यक्षिक कार्याची कॉपी होत नाही. विद्यार्थी-शिक्षकांना आपल्या आवडीप्रमाणे प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करता येते. म्हणून प्रात्यक्षिक कार्य निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थी-शिक्षकांना देण्यात यावे. प्रात्यक्षिक कार्याच्या निवडीमुळे मूल्यमापनात फरक पडतो. म्हणून मूल्यमापन करताना मूल्यमापन योजनेचे निकष निश्चित करावेत.

२) पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक कार्य व शालेय अनुभव कार्यक्रम यांचा एकमेकांशी संबंध आहे, तसेच या प्रात्यक्षिक कार्यासाठी स्वतंत्र वेळ द्यावा लागत नाही म्हणून ज्या महाविद्यालयांमध्ये पेपर क्र. ३ चे प्रात्यक्षिक कार्य या काळात पूर्ण करून घेतले जात नाही, अशा महाविद्यालयांनी हे प्रात्यक्षिक कार्य शालेय अनुभव कार्यक्रमात पूर्ण करून घ्यावे.

३) पेपर क्र. ४ च्या ऐच्छिक विषयाचे प्रात्यक्षिक कार्य वैयक्तिक दिल्यास विद्यार्थी-शिक्षकांना आपल्या आवडीप्रमाणे कामाची संधी मिळते. काही प्रात्यक्षिक अधिक

खर्चिक व अधिक मनुष्यबळ लागणारी असतील, तर ती गटवार नेमून देण्यात यावी. यामुळे प्रात्यक्षिक कार्यात विविधता येवून कॉपी होणार नाही.

४) मूल्यमापन कृतिसत्रातील प्रात्यक्षिक कार्यात पेपर क्र. ३ विभाग-२, तसेच अध्यापन पद्धतीतील तात्विक भाग आलेला आहे. म्हणून या कृतिसत्रापूर्वी मूल्यमापनासंबंधात घटक शिकविण्यात यावेत. त्यामुळे प्रात्यक्षिक कार्यास भरपूर वेळ देता येईल.

५) मानसशास्त्रीय प्रयोगशाळा व मानसशास्त्राचे प्रयोग यातील संबंध लक्षात घेता, अनुकूल वातावरण निर्मिती, प्रयोगासाठी लागणारे साहित्य, प्रयोगाची बैठक व्यवस्था आवश्यक आहे. म्हणून ज्या महाविद्यालयांमध्ये मानसशास्त्रीय प्रयोगशाळा, वैयक्तिक प्रयोगाचे पुरेसे साहित्य, प्रयोगासाठी लागणारी बैठक व्यवस्था नाही, अशा महाविद्यालयांनी वरील बाबींबी पूर्तता करावी.

## ३) आशयुक्त अध्यापन पद्धती व अंतर्गत परीक्षा :

१) आशययुक्त अध्यापन पद्धती कृतिसत्र प्रथमसत्राच्या शेवटी घेतल्यामुळे त्या काळात शाळांची परीक्षा असते. त्यामुळे सराव पाठ नसतात. म्हणून सदरहू कृतिसत्र प्रथम सत्राच्या शेवटी घेण्यात यावे.

२) विद्यापीठाच्या नियमानुसार दोन्ही अध्यापन पद्धतीवर आधारित आशययुक्त अध्यापन कृतिसत्र दहा दिवसांत पूर्ण करावे, अशी सूचना आहे. परंतू निरनिराळ्या महाविद्यालयांमध्ये ७, ८, १० व १२ दिवसांचे कृतिसत्र घेतले जाते. त्यामुळे विविधता येते. म्हणून विद्यापीठाच्या नियमानुसार ज्या महाविद्यालयांमध्ये १० दिवसांपेक्षा कमी व १० दिवसांपेक्षा जास्त काळात हे कृतिसत्र आयोजित केले जाते, अशा महाविद्यालयांनी सदरहू कृतिसत्राचे नियोजन १० दिवसांचे करावे.

३) आशययुक्त अध्यापन कृतिसत्र व आशय चाचणी यांच्या एकमेकांशी संबंध लक्षात घेवून आशय चाचणी परीक्षा कृतिसत्राच्या शेवटी घेण्यात यावी. कृतिसत्रानंतर

काही दिवसांनी चाचणी घेतल्यास महत्त्व राहत नाही. विद्यार्थी-शिक्षकांचे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. म्हणून ज्या महाविद्यालयामध्ये नंतर काही दिवसांनी चाचणी घेतली जाते, त्यांनी आशय चाचणी कृतिसत्राच्या शेवटच्या दिवशी घेण्याची व्यवस्था करावी.

४) विद्यापीठाचे अंतर्गत परीक्षांचे महत्व लक्षात घेऊन दोन अंतर्गत परीक्षा घेण्याचे सूचित केले आहे. एकच अंतर्गत परीक्षा घेतल्यामुळे वरील उद्देश सफल होत नाही. म्हणून अंतर्गत परीक्षेचा उद्देश लक्षात घेवून ज्या महाविद्यालयांमध्ये दोन अंतर्गत परीक्षा घेतल्या जात नाहीत, त्यांनी प्रथम सत्राच्या शेवटी एक व पाठ परीक्षेनंतर दुसरी अशा दोन अंतर्गत परीक्षा घेण्याचे नियोजन करावे.

५) अंतर्गत परीक्षा निरनिराळ्या महाविद्यालयांमध्ये निरनिराळ्या गुणांच्या घेतल्या जातात (उदा : ४०, ५०, ६०, १००) त्यामुळे प्रश्न व गुणविभागणी यामध्ये फरक आहे. विद्यार्थी-शिक्षकांना वार्षिक परीक्षेप्रमाणे प्रश्न लिहिण्याचा सराव होण्यासाठी प्रथमसत्राची अंतर्गत परीक्षा ५० गुणांची व द्वितीय सत्रातील अंतर्गत परीक्षा १०० गुणांची घेण्यात यावी म्हणून सर्व महाविद्यालयांना ही विविधता दूर करून वरील दोन अंतर्गत परीक्षा सर्व महाविद्यालयांमध्ये परीक्षा क्र. १ ५० गुणांची व परीक्षा क्र. २ १०० गुणांची याप्रमाणे घेण्याची व्यवस्था करावी.

## ४) समाजसेवा, कार्यानुभव, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रपाठ, शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिक

१) समाजसेवा प्रात्यक्षिक कार्य घेण्यापूर्वी पाच व्याख्याने दिली जावीत. पाच व्याख्याने देण्यापूर्वी प्रात्यक्षिक पूर्ण करून घेतले जाते, अशा महाविद्यालयांनी पाच व्याख्याने झाल्यावर प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करून घ्यावे.

२) विद्यार्थी-शिक्षकांमध्ये समाजसेवेची आवड व जाणीव जागृती निर्माण होण्यासाठी

महाविद्यालय परिसरातील या क्षेत्रातील व्यक्तींची काही व्याख्याने आयोजित करावीत. सर्वच व्याख्याने विभागप्रुखाने देवू नयेत म्हणून ज्या महाविद्यालयांमध्ये समाजसेवा क्षेत्रातील व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जात नाहीत. त्यांनी कमीत-कमी दोन व्याख्याने आयोजित करावीत.

३) शैक्षणिक वर्षात समाजसेवेचे उपक्रम सातत्याने घेण्यात यावेत. एक-दोन महिन्यात समाजसेवा उपक्रम पूर्ण न करता वर्षभर व्याख्याने व उपक्रम आयोजित करावेत, तसेच विद्यार्थी-शिक्षकांना निवासी शिबिराचा अनुभव घेण्यासाठी कमीत-कमी दोन दिवसांचे निवासी शिबीर आयोजित करावे. एका दिवसाच्या शिबिरात जाणे-येणे यातच वेळ जातो. त्यामुळे महाविद्यालयांमध्ये निवासी शिबीर घेतले जात नाही, त्यांनी निवासी शिबीर आयोजित करावे.

४) समाजसेवा या संदर्भात (समाजसेवा क्षेत्रतील तज्ञांचा अभाव, विद्यार्थी-शिक्षकांमध्ये आवड नाही, प्रात्यक्षिक अहवाल लेखन व्यवस्थित करत नाहीत) येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तज्ञ डॉक्टर, प्राध्यापक, समाजसेवक यांची व्याख्याने आयोजित करावी. विद्यार्थी-शिक्षकांमध्ये याविषयी आवड निर्माण होण्यासाठी व्याख्याने व प्रत्यक्ष भेटी यांचे आयोजन करावे. या संदर्भात समाजसेवांतर्गत वर्षभर सातत्य असावे. त्यातून आपोआप या समस्या दूर होतील.

५) विद्यापीठाच्या नियमानुसार कार्यानभवाची पाच तात्विक व्याख्याने देण्यात यावी व प्रात्यक्षिक कार्य देण्यात यावे. या नियोजनामागील पाश्र्वभूमी लक्षात घेवून ज्या महाविद्यालयांमध्ये २, ३, ४ तात्विक व्याख्याने दिली जातात, त्यांनी पाच व्याख्याने द्यावीत. त्याचप्रमाणे महाविद्यालयाने आपल्या सोयीनुसार व उपलब्धतेनुसार प्रात्यक्षिक कार्ये निश्चित करून प्रात्यक्षिकाच्या स्वरुपानुसार दिवस निश्चित करावेत.

६) कार्यानुभवाच्या प्रात्यक्षिकासाठी विविध प्रकारचे साहित्य आवश्यक असते. परंतु काही महाविद्यालयांमध्ये या साहित्याचा अभाव आहे म्हणून ज्या महाविद्यालयांमध्ये

साहित्य उपलब्ध नाही, त्यांनी कार्यानुभव प्रात्यक्षिकाचा उद्देश सफल होण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून द्यावे.

७) प्रशिक्षण महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात घेता आठवड्यातून एक तास कार्यक्रम घेण्यात यावा, परंतु काही महाविद्यालयांमध्ये दोन आठवड्यातून व काही महाविद्यालयात महिन्यातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतला जातो. हे प्रशिक्षणाच्या दृष्टीने अयोग्य आहे. तसेच हे कार्यक्रम ठेवण्याचा उद्देशही सफल होत नाही म्हणून अशा महाविद्यालयांनी प्रत्येक आठवड्यात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.

८) प्रशिक्षण महाविद्यालयात कुलपद्धतीने गट करण्यामागील उद्देश लक्षात घेता व सांस्कृतिक कार्यक्रमात ठराविक विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग न राहता सर्वांना संधी मिळावी म्हणून कुलपद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करावे. ज्या महाविद्यालयांमध्ये कुलपद्धती नाही व त्यानुसार कार्यक्रम घेतले जात नाहीत, त्यांनी कुलपद्धतीचा अवलंब करून त्यानुसार कार्यक्रम घेण्यात यावेत.

९) सांस्कृतिक कार्यक्रमातील विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग, कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी, कार्यक्रमातून उद्‍बोधन, सामाजिक समस्या या संदर्भात महत्त्व लक्षात घेवून त्यानुसार कार्यक्रमाचे स्वरूप ठरविण्यात यावे.

१०) प्रपाठासाठी तीन प्रश्न देण्यात यावेत. त्यांची उत्तरे विद्यार्थी-शिक्षकांना लिहिण्यास सांगून ती तपासून घ्यावी लागतात. म्हणून यासाठी लागणारा वेळ लक्षात घेता, प्रपाठाचे प्रश्न दोन आठवडे अगोदर नोटीस बोर्डावर लावण्यात यावेत. एक आठवडा अगोदर दिल्यास लेखन व तपासणे यासाठी वेळ कमी पडतो. म्हणून महाविद्यालयांमध्ये प्रपाठाचे प्रश्न एक आठवडा अगोदर लावले जातात, त्यांनी हे प्रश्न दोन आठवडे अगोदर नोटीस बोर्डावर लावावेत.

११) प्रपाठासाठी तीन प्रश्न देणे, त्यांची उत्तरे लिहिणे व तपासून घेणे यामागील उद्देश

लक्षात घेवूनच प्रपाठास बसण्याची परवानगी द्यावी, परंतु अनेक महाविद्यालयांमध्ये प्रश्न तपासून घेत नाहीत व न तपासताही प्रपाठास बसू दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक त्या प्रश्नांची उत्तरे व्यवस्थित लिहित नाहीत व काही विद्यार्थी-शिक्षक प्रपाठ लिहित नाहीत. त्यामुळे वरील उद्देश सफल होत नाहीत. म्हणून अशा महाविद्यालयांनी उत्तरे तपासून घेतल्याशिवाय विद्यार्थी-शिक्षकांना प्रपाठास बसू देवू नये.

१२) विद्यापीठाच्या नियमानुसार शारीरिक शिक्षणासाठी पाच व्याख्याने व प्रात्यक्षिकाचा सराव देण्यासाठी खेळाचे आवश्यक साहित्य प्रत्येक महाविद्यालयात असावे, परंतु निम्म्या महाविद्यालयांमध्येही आवश्यक खेळांचे साहित्य उपलब्ध नाही. म्हणून अशा महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्षभरात पाच तात्त्विक व्याख्याने घेण्याचे व आवश्यक खेळाचे साहित्य खरेदी करावे.

१३) शारीरिक शिक्षणात विद्यार्थी-शिक्षकांचा अपेक्षित सहभाग मिळण्यासाठी तज्ञ शिक्षकांची व्याख्याने, खेळाचे महत्त्व, तसेच खेळाची आवड निर्माण होण्यासाठी काही खेळांचे साहित्य महाविद्यालयात उपलब्ध करून दिले, तर विद्यार्थी-शिक्षकांमध्ये या शिक्षणाची आवड निर्माण होवून त्यांचा सहभाग वाढेल. म्हणून महाविद्यालयांनी शहरातील शारीरिक शिक्षणातील तज्ञ शिक्षकांची व्याख्याने आयोजित करावीत, तसेच आवश्यक कौशल्ये निर्मितीसाठी आवश्यक खेळ साहित्य उपलब्ध करून द्यावे.

५) वार्षिक पाठ परीक्षा

१) वार्षिक पाठ परीक्षेचे महत्त्व लक्षात घेवून पाठ परीक्षेचे मूल्यमापन प्रभावी होण्यासाठी अनुभवी बहिस्थ परीक्षक आवश्यक आहेत. परंतु अनुभवी बहिस्थ परीक्षक उपलब्ध होत नसल्यामुळे उपलब्ध शिक्षकांमधून परीक्षक नेमले जातात. त्यामुळे पाठ परीक्षेचे मूल्यमापन व्यवस्थित होत नाही. म्हणून विद्यापीठानेच इतर शहरातील बहिस्थ परीक्षक नेमण्याची व्यवस्था करावी. मार्गदर्शन करून या समस्यांचे निराकरण करावे.

२) पाठ परीक्षेसाठी अनुभवी बहिस्थ परीक्षक रजेअभावी व मिळणारे अत्यल्प मानधन त्यामुळे हे कार्य नाकारतात. म्हणून विद्यापीठाने शिक्षण खात्याशी संपर्क साधून पाठ परीक्षकांसाठी रजेची सवलत मिळवून द्यावी, तसेच पाठ परीक्षेच्या शेवटी महाविद्यालयामार्फत मानधन देण्याची व्यवस्था करावी.

## ६.४ पुढील संशोधनासाठी विषय

१) शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित बी. एड्. महाविद्यालयामध्ये प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करताना विद्यार्थी शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास.

२) अन्य विद्यापीठाशी संलग्नित बी. एड्. महाविद्यालया मध्ये प्रात्यक्षिक कार्याची कार्यवाही करताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास

३) शिवाजी विद्यापीठ व अन्य विद्यापीठातील बी.एड्. प्रात्यक्षिक कार्याचा तुलनात्मक अभ्यास.